Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

50

मोबाईल पेमेंट ॲप्लीकेशन वापरणाऱ्यांना होणाऱ्या फायदे व तोट्यांचा अभ्यास

डॉ. विवेक सुरेश श्रावगे
धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर, जि. जळगांव

प्रस्तावना :

पैसा ही सर्वांच्या जीवनाशी निगडीत अशी बाब आहे. सर्व खरेदी विक्री ही पैशांनी पार पाडली जाते भारताच्या बाबतीत रुपया हे सर्व मान्य चलन आहे परंतु परंपरागत पद्धतीने देवाण-घेवाण करताना पैशाचा वापर केला जात आहे. जसे आर्थिक व्यवहार वाढले त्यातून सरकारला नियमानुसार आयकर देणे क्रमप्राप्त आहे. आयकर हा प्रत्यक्ष कर असून ज्या व्यक्ती कर भरण्यासाठी पात्र आहे. त्यांना नियमानुसार कर भरावा लागतो. प्रामाणिक करदात्यांकडून वेळेवर कर सरकारकडे जमा केला जातो. परंतु काही ठिकाणी कर जमा करतांना अनियमितता दाखवून कर चोरी करतात. यातून काळा पैसा निर्माण होतो तसेच यासोबत काही बनावट नोटा सुद्धा चलनात असण्याची शक्यता असते यातून सरकारने रोख पैशाला पर्याय म्हणून देशात मोबाईल क्रांती झाल्यानंतर स्मार्टफोन आणि इंटरनेट वापर कर्त्यांची संख्या सातत्याने वाढत आहे हे पाहून सरकारने मोबाईल पेमेंट ॲप्लीकेशन पुरवणाऱ्या कंपन्यांना परवानगी दिली. हे ॲप्लीकेशन विनामूल्य मोबाईल मध्ये डाऊनलोड करून अगदी सहज वापरता येऊ लागले. याच्या साह्याने पैसे घेवाण-घेवाण बरोबर वस्तू व सेवांची खरेदी विक्री नियमित देणे इत्यादी कार्य सहज करता येऊ लागले.

पूर्व प्रकाशित साहित्य :

1) गौरव त्यागी, ऋषिकेश जगदाळे, निलेश अनुते

मोबाईल ॲप्लिकेशन्स वापरणाऱ्यांची संख्या यामध्ये गुगल पे, फोन पे, पेटीएम, ॲमेझॉन पे, भीम ॲप या ॲपचा समावेश आहे. जवळपास 83 पैकी 73 वापरकर्त्यांनी यूपीआय ला प्राधान्य दिलेले आहे. ॲमेझॉन पे या ॲप्लीकेशन मध्ये कॅशबॅक आणि ऑफर्स असल्यामुळे वापरकर्त्यांकडून याला सुद्धा प्राधान्य दिले जाते. सरकारकडून पैसा विहित अर्थव्यवस्थेला प्राधान्य दिले जात आहे. कोविड-19 या कालावधीत वापरकर्त्यांनी डिजिटल पेमेंट ॲप्स ला प्राधान्य दिलेले आहे. वापर करतांना व्यवहार गोपनीय आहे.

सध्या जगात डिजिटलायझेशनवर भर दिला जात आहे आणि या संख्येत प्रत्येक वर्षी वाढ होत आहे. त्यामुळे यूपीआय वापरणाऱ्यांच्या संख्येत भर पडत आहे. फोन पे, गुगल पे, ॲमेझॉन पे, भीम युपीआय असे प्रकार आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यावर बाजारातील हिस्सा कमी जास्त होत असतो. कोविड-19 मध्ये प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार ऐवजी या ॲप्लीकेशनवर वापरकर्त्यांकडून भर दिला जात आहे.

संशोधनाशी संबंधित घटक :

1) वापरकर्त्यांच्या संख्येत मोठी वाढ 2) सरकारकडून पैसा विरहित अर्थव्यवस्थेवर भर

2) शैलाक जानी :

भारतातील मोबाईल पेमेंट व्यवस्थेमध्ये भारतात स्मार्टफोन वापरणाऱ्यांच्या संख्येत सतत वाढ होत आहे आणि सोबत इंटरनेटचा सुद्धा वापर वाढत आहे याचा परिणाम मोबाईल पेमेंट व्यवस्थेचा विकास होत आहे. ई-कॉमर्स आणि मोबाईल बँकिंग चा समावेश आहे. 2015 या वर्षात जगात 69 टक्के मोबाईल वापरणारे बँकिंगशी संबंधित कामे मोबाईलच्या माध्यमातून करीत होते. देशात आधार कार्ड केवायसी साठी वापरले जाते. डिजिटल पेमेंट सिस्टीमला चालना देण्यासाठी ग्राहक हे डिजिटल सिस्टीमचा वापर करीत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी डिजिटल पेमेंट आवश्यक आहे. ग्राहकांच्या अनुभव हा सुद्धा डिजिटल पेमेंट सिस्टीम मध्ये चांगला आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार ही रोखीने केले जातात पण यामुळे काही व्यवहार हे डिजिटल स्वरूपात होणार आहे आणि भविष्यात यात वाढ सुद्धा होणार आहे.

संशोधनाशी संबंधित घटक :

1) स्मार्टफोन आणि इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येमुळे डिजिटल पेमेंट सिस्टीम वापरणाऱ्यांची संख्या देशात वाढणार आहे.
2) देशात रोख व्यवहारांना पर्याय म्हणुन डिजीटल पेमेंट सिस्टीमचा वापर वाढत आहे.

संशोधन पद्धती : संशोधकाकडून संशोधनात संशोधन पद्धती वापरताना प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारची माहिती गोळा केली गेलेली आहे. यासाठी संशोधक मोबाईल पेमेंट ॲप्लिकेशन्स वापरणाऱ्या प्रतिसादकांकडून माहिती गोळा करणार आहे शक्यतो सज्ञान बँक खातेदार यांची माहिती प्रतिसादकांकडून गोळा केली जाणार आहे संशोधकाने 135 बँक खातेदारांची निवड केलेली आहे यापैकी 100 खातेदार हे मोबाईल पेमेंट ॲप्लीकेशन वापरणारे आहे.

माहिती गोळा करण्याची पद्धती : संबंधित संशोधना करिता संशोधकाने प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही स्वरूपाची माहिती गोळा केलेली आहे.

प्राथमिक स्रोत : याकरिता संशोधकांनी प्रश्नावली तयार केलेली आहे. ही प्रश्नावली तयार करणे, भरून घेणे यासाठी Google Form चा वापर केला गेलेला आहे. ही प्रश्नावली प्रतिसादकांकडून भरून यातील माहितीचे विश्लेषण करून तक्ते आलेख आणि स्पष्टीकरण केलेले आहे.

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved